# अपील

(अ) अपील कोणाकडे करता येईल

जिल्हा मंचाच्या आदेशाविरूध्द राज्य आयोगाकडे अपील करता येईल. राज्य आयोगाच्या आदेशाविरूध्द राष्ट्रीय आयोगाकडे अपील करता येईल आणि राष्ट्रीय आयोगाच्या आदेशाविरूध्द करावयाचे अपील सवोच्च न्यायालयाकडे करता येईल.

(ब) अपील कोण करू शकेल

जिल्हा मंचाच्या आदेशादवारे ज्या व्यक्तीवर अन्याय झाला असेल अशी व्यक्ती तो जिल्हा मंच ज्या राज्यात असेल त्या राज्याच्या राज्य आयोगाकडे अपील करू शकतो. अन्याय झालेली व्यक्ती म्हणजे त्या आदेशामुळे जिला कोणत्याही कायदेशीर हक्क असलेल्या गोष्टीला वंचित व्हावे लागले असेल किंवा जिला कायदेशीरपणे मिळणे आवश्यक असलेली एखादी गोष्ट नाकारली असेल किंवा जिच्या एखादया न्याय हक्कावर गैरपणे परिणाम केला गेला असेल अशी व्यक्ती. मात्र अशा व्यक्तीला आपला प्रतिनिधी म्हणून वकिलामार्फत किंवा नोंदणीकत ग्राहक संघामार्फत अपील दाखल करता येईल.

(क) अपील दाखल करण्याची पदधती-

अपील अपील-ज्ञापनाव्दारे दाखल करावयाचे असते. अपील एकतर व्यक्तीशः देता येते किंवा नोंदणीकत डाकेने संबंधित आयोगाकडे पाठवता येते. अपील ज्ञापन स्वच्छ अक्षरात किंवा शक्यतो टंकलिखित स्वरूपात तयार करावे. अपिलाची कारणे क्रमवार नमूद करण्यात यावी व तसेच ज्या आदेशाविरूध्द अपील करण्यात आले असेल, त्याची प्रमाणित प्रतही ज्ञापनासोबत जोडावी.

अपील आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत दाखल करावे. त्यापेक्षा उशिरा केल्यास उशिराची सबळ कारणे व क्षमापन अर्ज सोबत जोडावा.

(ड) अपिलाचे प्रारूप तयार करणे-

या अपिलाचे ज्ञापनसुध्दा दिवाणी अपिलाप्रमाणेच तयार करण्यात यावी.

1. अपील ज्ञापनामध्ये अपील सादर करावे व त्यावर अपीलकर्त्याने किंवा त्याच्या वकिलाने स्वाक्षरी केली पाहिजे. या अपील ज्ञापनासोबत ज्या आदेशाविरूध्द किंवा न्यायनिर्णयाविरूध्द अपील करण्यात आले असेल, त्याची प्रत जोडण्यात यावी.

2. अपील प्राधिकरणाचे नाव, अपील क्रमांक, अपील ज्याविरध्द केले असेल त्या आदेशाचे थोडक्यात वर्णन आणि अपिलाची किंमत, या गोष्टी प्रारंभी नमूद करण्यात याव्यात.

3. ज्ञापनासोबत कलम 15 प्रमाणे जिल्हा मंचाचे आदेशाप्रमाणे जी रक्कम भरायची आहे त्या रकमेच्या 50 टक्के किंवा पंचवीस हजार रूपये यापैकी जी रक्कम कमी असेल ती रेखांकित डिमांड ड्रॉफ्ट किंवा भारतीय पोस्टल ऑर्डरने राज्य आयोगाचे प्रबंधकामार्फत भरली असेल त्याचा तपशील द्यावा.

4. ज्ञापनाचा मजकूर-अपील संक्षिप्तपणे पण सुस्पष्ट शब्दांत असावे व प्रत्येक मुददा वेगवेगळा व शीर्षवार नमूद करण्यात यावा. सलग क्रमांक द्यावे.